**कृपया प्रसिध्दीसाठी** **7 जानेवारी 2010**

## राम नाईक अमृत महोत्सवी ग्रंथासाठी आवाहन

**मुंबई, गुरुवार :** जनसेवेचे व्रत आयुष्यभर निष्ठेने पाळणारे ज्येष्ठ भाजपा नेते व माजी पेट्रोलियम मंत्री यांच्या आयुष्यातले हे अमृत महोत्सव वर्ष आहे. भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष व माजी केंद्रिय मंत्री श्रीमती जयवंतीबेन महेता यांच्या अध्यक्षतेखाली श्री. राम नाईक यांच्या सुहृद व सहका-यांनी ‘राम नाईक अमृत महोत्सव समिती’ गठित केली असून आगामी महिन्यांत अमृत महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. समितीचे कार्याध्यक्ष भाजपा मुंबई अध्यक्ष व आमदार श्री. गोपाळ शेट्टी असून श्री. मधु चव्हाण आणि श्री. जयप्रकाश ठाकुर हे संयुक्त कार्यवाह आहेत.

अमृत महात्सवाच्या निमित्ताने श्री. राम नाईक यांच्या सन्मानार्थ गौरव ग्रंथ प्रकाशित करण्यात येणार असून त्यामध्ये श्री. राम नाईक यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वावर, कार्यावर प्रकाशझोत टाकणारे मान्यवरांचे लेख तसेच त्यांच्या सहका-यांचे, चाहत्यांचे , जनतेचे विविधरंगी संस्मरणीय अनुभव संकलित करण्याचे समितीने ठरविले आहे. गेल्या पन्नास वर्षांच्या राजकीय, सामाजिक कारकिर्दीत श्री. राम नाईक यांचा हजारो लोकांशी व्यक्तिशः संपर्क आला. शेकडो अपरिचितांसाठीही श्री. नाईक यांनी काम केले. या सर्वांनी आपल्या भावविश्वात श्री. राम नाईक यांना विशेष स्थान दिले आहे. श्री. राम नाईक यांच्या या चाहत्यांनी श्री. राम नाईक यांच्याबाबतचे आपले संस्मरणीय अनुभव शब्दबध्द करुन पाठवावेत असे आवाहन समितीच्या अध्यक्ष श्रीमती जयवंतीबेन महेता यांनी केले आहे. निवडक अनुभवांचा समावेश गौरव ग्रंथात करावयाचा असल्याने नागरिकांनी 20 जानेवारीपर्यंत राम नाईक अमृत महोत्सव समिती, वसंतस्मृती, दादासाहेब फाळके रस्ता, दादर पूर्व, मुंबई 400 014 येथे आपले अनुभव लिहून पाठवावेत. तसेच आपले नाव, पत्ता व दूरध्वनीही नमूद करावा अशी विनंती श्रीमती महेता यांनी केली आहे.

**(संयुक्त कार्यवाह)**